# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे -४

सर्व्हे नं. ८३२ अ, फायनल प्लॉट क्र. १७८/१७९, बी.एम.सी.सी.रोड,
बालचित्रवाणी शेजारी, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे -४११ ००४

फोन नं. - ०२० -२५७०५०००  फॅक्स नं. - २५७०५१२२/२५६६५८०८


तात्काळ/परीक्षा प्राधान्य

क्र.रा.मं./पापुई/ 3132
दिनांक - १४ जून,२०१९

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/
नाशिक/लातूर/कोकण विभागीय मंडळे,

विषय :- माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च-२०१९ च्या परीक्षेनंतर जुन्या अभ्यासक्रमाच्या विषयामध्ये सूट न मिळालेल्या /उत्तीर्ण न झालेल्या विद्यार्थ्यांबाबत...

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून इ.९वी साठी व वर्ष २०१८-१९ पासून इ.१०वीच्या पुनर्रचित अभ्यासक्रमांची अंमलबजावणी करण्यात येवून, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र मार्च-२०१९ ची परीक्षा दिनांक ०१.०३.२०१९ ते २२.०३.२०१९ या कालावधीत पुर्नरचित व जुन्या अभ्यासक्रमाप्रमाणे आयोजित करण्यात आलेल्या होत्या. विद्यार्थ्यांना जुन्या अभ्यासक्रमानुसार परीक्षेला प्रविष्ठ होण्याची अंतिम संधी या परीक्षेस देण्यात आलेली होती.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून पुनर्रचित अभ्यासक्रमाप्रमाणे इ.१०वीच्या पुढील विषयांचे इतर विषयांमध्ये एकत्रीकरण केले अथवा सदर विषय बंद करण्यात आलेले आहेत. जे विद्यार्थी मार्च-२०१९ व त्यापूर्वीच्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा(इ.१०वी) मध्ये सदर विषयात उत्तीर्ण होऊ शकले नाहीत त्यांचेबाबत करावयाच्या कार्यवाहीचा विषय दिनांक- १०/०६/२०१९ रोजीच्या परीक्षा समितीपुढे सादर करण्यात आलेला होता. सदर परीक्षा समितीच्या निर्णयानुसार पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. **सामान्य गणित (७४)** - ज्या विद्यार्थ्यांना मार्च-२०१९ व त्यापूर्वीच्या परीक्षेस **सामान्य गणित** मध्ये सूट मिळालेली नाही अथवा या विषयात विद्यार्थी उत्तीर्ण झालेला नाही अशा विद्यार्थ्यांना विषय बदल करून पुनर्रचित अभ्यासक्रमातील गणित भाग-०१ व भाग-०२ या विषयांना पुढील परीक्षेस उत्तीर्ण व्हावे लागेल.

२. **आय.सी.टी (माहिती संप्रेषण तंत्रज्ञान)** (४१ ) :- ज्या विद्यार्थ्यांना मार्च-२०१९ व त्यापूर्वीच्या परीक्षेस **आय.सी.टी (माहिती संप्रेषण तंत्रज्ञान )** मध्ये सुट मिळालेली नाही अथवा या विषयात विद्यार्थी उत्तीर्ण झालेला नाही. अशा विद्यार्थ्यांना पुनर्रचित अभ्यासक्रमातील नव्याने समाविष्ठ झालेला शालेय श्रेणी विषयातील **स्व-विकास व कलारसास्वाद (आर-७)** हा श्रेणी विषय घेवून पुढील परीक्षेस उत्तीर्ण व्हावे लागेल.

२....

३. शालेय श्रेणी विषय :- ज्या विद्यार्थ्यांना मार्च-२०१९ व त्यापूर्वीच्या परीक्षेस व्यक्तिमत्व विकास (आर-६), समाजसेवा (पी-६), कार्यशिक्षण (पी-७), व्यवसाय मार्गदर्शन (आर-४) यापैकी एका विषयामध्ये सुट मिळालेली नाही अथवा विद्यार्थी उत्तीर्ण झालेला नाही. अशा विद्यार्थ्यांना पुनर्रचित अभ्यासक्रमातील नव्याने समाविष्ट झालेला शालेय श्रेणी विषयातील **स्व-विकास व कलारसास्वाद (आर-७)** हा श्रेणी विषय घेवून पुढील परीक्षेस प्रविष्ठ होऊन पुढील परीक्षेस उत्तीर्ण व्हावे लागेल.

४. पूर्व व्यवसायिक अभ्यासक्रम- ज्या विद्यार्थ्यांना मार्च-२०१९ व त्यापूर्वीच्या परीक्षेस मध्ये मूलभूत तंत्रज्ञानाची ओळख (व्ही १), यंत्र अभियांत्रिकीची मूलतत्वे (व्ही-२), विद्युत व इलेक्ट्रॉनिक्स तंत्रशास्त्राची मूलतत्वे (व्ही-३) या श्रेणी विषयामध्ये सूट मिळालेली नाही अथवा या विषयात विद्यार्थी उत्तीर्ण झालेला नाही. अशा विद्यार्थ्यांना पुनर्रचित अभ्यासक्रमातील नव्याने समाविष्ठ झालेला शालेय श्रेणी विषयातील स्व-विकास व कलारसास्वाद (आर-७) हा श्रेणी विषय घेवून पुढील परीक्षेस प्रविष्ठ होऊन पुढील परीक्षेस उत्तीर्ण व्हावे लागेल.

तसेच याबाबतचे स्वतंत्र परिपत्रक सर्व माध्यमिक शाळांना विभागीय मंडळस्तरावर निर्गमित करावे.

(डॉ. अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे ०४.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर- ४१६ ००४

क्र.कोविमं/शाखा माध्य. परीक्षा/ ६०४
कोल्हापूर ४१६ ००४.
दिनांक १५.०६.२०१९

प्रति,
सर्व मान्यताप्राप्त शाळा प्रमुख,
सातारा, सांगली व कोल्हापूर

कोल्हापूर विभागीय मंडळातील मान्यताप्राप्त मुख्याध्यापकांना कळविण्यात येते की, राज्य मंडळाने जा.क्र.रा.मं./पापुई/३१३२ दि. १४/०६/२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविल्याप्रमाणे सर्व शाळा प्रमुखांनी नोंद घेवून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०१९ च्या परीक्षेनंतर जुना अभ्यासक्रमाच्या विषयामध्ये सूट न मिळालेल्या /उत्तीर्ण न झालेल्या विद्यार्थ्याबाबत पत्रातील ४ सुचनानुसार पुढील कार्यवाही करावी.

विभागीय सचिव, करिता
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर